# The Child Labour (Prohibition and Regulation) Act, 1986

## भाग दोन

### विवक्षित व्यवसायात आणि प्रक्रियेत बालकांना नोकरीवर ठेवण्यास प्रतिबंध

बालकांना नोकरीवर ठेवण्यास प्रतिबंध.

३. कोणत्याही बालकाला, अनुसूचीच्या "भाग क" मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही व्यवसायात किंवा विवक्षित व्यवसायात ज्या कोणत्याही कार्यशाळेत अनुसूचीच्या "भाग ख" मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही प्रक्रिया करण्यात येत आणि प्रक्रियेत असतील त्या कार्यशाळेत कामावर लावता येणार नाही किंवा काम करण्याची परवानगी मिळणार नाही :

परंतु, या कलमातील कोणतीही गोष्ट, ज्या कोणत्याही कार्यशाळेत अधिनियंत्रक त्याच्या कुटुंबाच्या मदतीने कोणतीही प्रक्रिया करीत असेल अशा कार्यशाळेला किंवा शासनाने स्थापन केलेल्या किंवा शासनाकडून सहाय्य किंवा मान्यता प्राप्त झालेल्या कोणत्याही शाळेला लागू असणार नाही.

## भाग चार

### संकीर्ण

शास्ती.

१४. (१) जो कोणी, कलम ३ च्या तरतुदींचे व्यतिक्रमण करून कोणत्याही बालकास नोकरीवर ठेवील किंवा काम करण्याची परवानगी देईल तो, तीन महिन्यांपेक्षा कमी नसणाऱ्या परंतु एक वर्षापर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या कारावासास किंवा दहा हजार रुपयांपेक्षा कमी नसणाऱ्या परंतु वीस हजार रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल.

(२) जो कोणी, कलम ३ खालील अपराधाचा सिद्धदोषी असेल त्याने तदनंतर तसाच अपराध केल्यास, तो सहा महिन्यांपेक्षा कमी नसणाऱ्या परंतु दोन वर्षांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असेल.

(३) जो कोणी,—

(क) कलम ९ द्वारे आवश्यक असलेली नोटीस देण्यास कसूर करील ; किंवा

(ख) कलम ११अ अनुसार आवश्यक असलेली नोंदवही राखण्यास कसुर करील किंवा अशा कोणत्याही नोंदवहीत खोटी नोद करील; किंवा

(ग) कलम १२ अनुसार आवश्यक असल्याप्रमाणे कलम ३ चा आणि या कलमाचा गोषवारा अंतर्भूत असणारी नोटीस लावण्यास कसूर करील ; किंवा

(घ) या अधिनियमाच्या किंवा त्याखाली करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदींचे अनुपालन करण्यास कसूर करील, किंवा त्यांचे व्यतिक्रमण करील,

तो एक महिन्यापर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या साध्या कारावासास किंवा दहा हजार रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल.